**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२६**
**----------------**
**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ६, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

-------------------------------------
**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**
-------------------------------------

**राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची थकीत मजुरी अदा करण्याबाबत**

**(१) * २३४७९ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.केवलराम काळे (मेळघाट) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व विशेषतः गडचिरोली, बुलढाणा, ठाणे जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात गत वर्षाच्या तुलनेत मजुरांची उपस्थिती निम्म्याने घटल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२४ मध्ये राहेरी खुर्द (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील महोगनी व वृक्षलागवडीसह विविध स्वरुपाची कामे रोजगार हमीच्या मजुरांमार्फत करुन घेण्यात आली असून गडचिरोली जिल्ह्यातील ४५६ ग्रामपंचायतींपैकी केवळ २१४ ग्रामपंचायतींमध्येच रोजगार हमी योजनेचीच सध्या कामे सुरू असून एकूण १ लाख नोंदणीकृत मजुरांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट अपूर्ण राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील घरकुलांच्या बांधकामावर काम करणाऱ्या हजारो मजुरांची तब्बल ६१ लाखाहून अधिक रुपयाची मजुरी थकीत असल्याने या मजुरांची उपासमार होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत दोन वर्षांपासून उक्त जिल्ह्यातील मजुरांना त्यांची मजुरी मिळण्यास ४ ते ६ महिन्यांचा विलंब होत असल्यामुळे ते शेजारील तेलंगणा व मध्यप्रदेश या राज्यांत धान रोवणी व कापूस वेचणीसाठी मोठ्या

प्रमाणावर स्थलांतरित होत आहेत. तसेच संबंधित गटविकास अधिकारी यांना वारंवार निवेदने देऊन थकीत मजूरी अदा करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) राज्यातील विशेषतः गडचिरोली, बुलढाणा, ठाणे जिल्ह्यासह महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ज्या अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनावरील मजुरांची मजुरी देण्यास विलंब केला आहे त्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासह काम करणाऱ्या मजुरांची १७० कोटी रुपयांची थकीत रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) केंद्र शासनाकडे निधी उपलब्धतेकरीता पाठपुरावा सुरु असून निधी प्राप्त होताच तात्काळ वितरीत करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांचा समावेश योजनेत करण्याबाबत**

**(२) * २४७१२ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, अक्कलकोट तालुक्यासह जिल्ह्यातील हजारो पात्र शेतकरी दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयातील अटीमुळे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडिलांच्या हयातीत कायदेशीर वाटणीपत्राद्वारे जमीन नावावर झालेल्या नवीन शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांनी तालुका कृषी कार्यालयाकडे वारंवार अर्ज करूनही दोन ते अडीच वर्षांपासून त्यावर कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने गरजू शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयामध्ये आवश्यक बदल करून राज्यासह उक्त जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने दिनांक २१ जून, २०१९ रोजी कार्यात्मक मार्गदर्शक सूचना विहित केल्या आहेत.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ, ज्या शेतकऱ्यांची नावे जमिनीच्या नोंदींमध्ये नोंदली गेली आहेत, अशाच कुटुंबांना दिला जातो. तसेच, सदर मार्गदर्शक सूचनांनुसार

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निर्धारण करण्यासाठी अंतिम तारीख दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ अशी निश्चित करण्यात आली असून, पुढील ५ वर्षांसाठी योजनेअंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी कोणतेही बदल विचारात घेतले जात नाहीत. मात्र, मृत्यूमुळे वारसाहक्काने लागवडयोग्य जमिनीच्या मालकीचे हस्तांतरण झाल्यास हा दिनांक लागू होत नाही.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार सोलापूर जिल्ह्यातील नोंदणीकृत ६,९९,५८८ लाभार्थ्यांपैकी ६,८२,१४१ लाभार्थींना एकूण रु.२१८५.६४ कोटी इतकी रक्कम एकुण २१ हप्त्यांमध्ये दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत पात्र शेतकरी कुटुंबांच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा करण्यात आली आहे.

(४) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने दिनांक २१ जून, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या कार्यात्मक मार्गदर्शक सूचनांतर्गत योजनेच्या लाभाच्या पात्रतेसाठी विहित केलेले निकष हे ५ वर्षांसाठी लागू होते.

दिनांक २१ जून, २०२४ रोजी सदर मार्गदर्शक सूचनेस पाच वर्षे पूर्ण झाली असल्याने, केंद्र शासनास जमीन धारणेच्या अंतिम दिनांकाची (cut off date) अट शिथील करण्याबाबत दिनांक २५ जून, २०२४ रोजी विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांच्या घरकुलाची मजूरी प्रलंबित असल्याबाबत

**(३) * २५२८२ श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील आदिवासी कातकरी तसेच गरीब लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाली असून त्यांना घरकुलांचा लाभ मिळत नसल्याने श्रमजीवी संघटनेने शहापूर पंचायत समिती कार्यालयावर दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान घरकुल हक्क मोर्चा काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी कातकरीसह गरीब, भुमिहीन व वंचितांनी कर्ज काढून तसेच उसनवारीवर बांधकाम साहित्याची खरेदी करून घरकुले बांधली असून शासकीय नियमानुसार त्यांना मिळणारी मजुरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, शहापूर तालुक्यातील आदिवासी कातकरी तसेच गरीब लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही त्यांना मजुरी व घरकुले न मिळाल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३), (४), (५) i. पीएम-जनमन योजनेंतर्गत ३७६० मंजूर घरकुल लाभार्थ्यांपैकी ३७३३ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, २६१७ लाभार्थ्यांना दूसरा हप्ता व २८८ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता देण्यात आलेला आहे. ३३२८ लाभार्थ्यांचे घरकुले पूर्ण झाली असून ४३२ घरकुले प्रगतिपथावर आहेत. उर्वरीत लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम स्थिती

नुसार काम सुरु नसल्याने अनुदान देण्यात आलेले नाही.

ii. घरकुल लाभार्थ्यांना मजुरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून देण्यात येते. तांत्रिक अडचणीमुळे FTO ची मजूरी लाभार्थ्याच्या खात्यांवरती जमा झालेली नसल्याबाबत आयुक्त, नरेगा यांना उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो.), ठाणे यांनी कळविले आहे. तांत्रिक अडचणीचे निराकरण होताच लाभार्थ्यांना मजूरीची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही म.ग्रा.रो.ह.यो. च्या विभागामार्फत मार्फत करण्यात येईल.

-----------------

**बीड (जि.बीड) शहरातील वृक्ष लागवड अभियानात अनियमितता झाल्याबाबत**

**(४)** * **२४१३५ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (जि.बीड) शहरात हवामान बदल, प्रदूषण व जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर एका दिवसात तब्बल ३० लक्ष वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवून विशेष अभियान राबविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियानांतर्गत कागदोपत्री मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड दाखवण्यात आली असून प्रत्यक्षात शहरातील रेल्वे स्टेशन परिसरासह विविध ठिकाणी लावलेले वृक्ष कोरडे पडलेले, तुटलेले अथवा देखभालअभावी नष्ट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्ष लागवडीनंतर आवश्यक असलेला पाणीपुरवठा, कुंपण, देखभाल व निगा न राखल्यामुळे शासनाच्या निधीतून करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीचा उद्देश अपयशी ठरत असल्याने शासकीय निधीचा अपव्यय होत असून संबंधित यंत्रणा, कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांकडून वृक्ष लागवड व संगोपन नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, शहरातील वृक्ष लागवड अभियानाच्या अंमलबजावणीतील संबंधित यंत्रणा, कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासह भविष्यात वृक्ष लागवड केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी न करता संगोपनासह प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) होय.

बीड जिल्ह्यात "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या वृक्ष लागवड अभियानांतर्गत दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजी एका दिवसात ३० लक्ष वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवून विशेष अभियान राबविण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

बीड जिल्ह्यात वृक्ष लागवड अभियानांतर्गत दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजी एकूण ७०,३३,५५३ वृक्ष लागवड करण्यात आली असून माहे ऑक्टोबर, २०२५ अखेर जिवंत रोपांची टक्केवारी ९०.८३ % इतकी आहे. सदर अभियानांतर्गत रेल्वे प्रशासनामार्फत कुठल्याही प्रकारची वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

या योजनेंतर्गत लावण्यात आलेल्या वृक्षांचे संरक्षण व संगोपनाची जबाबदारी संबंधित यंत्रणेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे असून जिवंत रोपांच्या टक्केवारीनुसार, शासकीय निधीचा अपव्यय झालेला नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषतः बीड, सोलापूर व ठाणे जिल्ह्यातील जंगलांना लागलेल्या आगीबाबत

**(५) * २३९१४ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः बीड, सोलापूर, ठाणे जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी ते १५ एप्रिल, २०२५ या कालावधीत १ हजार २१५ वणवे लागल्याच्या घटना घडल्याचे सन २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील पालवन शिवारातील सह्याद्री देवराई प्रकल्पास भीषण आग लागून सदर प्रकल्पातील झाडे, औषधी वनस्पती तसेच पक्षांचा होरपळून मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा शहरालगत सामाजिक वनीकरण विभागाच्या हद्दीतील एकवीरा येथे अज्ञात समाजकंटकांनी गवत पेटवून दिल्याने सुमारे अडीच हेक्टर क्षेत्रावरील झाडे जळून खाक झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर परिसरात झाडांच्या संरक्षणासाठी शासनाने वॉल कंपाऊंड उभारून लाखो रुपयांचा निधी खर्च केला असूनही तेथे बेकायदा वृक्षतोड होऊन परिसरात मद्यपींचा वावर वाढल्याने वनसंपदेचे नुकसान होत असून वनविभागाचे कार्यालय व कर्मचारी यांचे निवासस्थान असूनही अधिकारी तेथे राहत नसल्याने व्यवस्था विस्कळीत झाली असून आगीच्या वेळी नागरिकांनी संपर्क साधूनही विभागाच्या दिरंगाईमुळे वनसंपदेचे मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, बदलापूर अंबरनाथ व कल्याण या विभागातील वनपट्ट्यांमध्ये वेळोवेळी वणवे लागून वनसंपदा नष्ट झाल्याच्या घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आल्या आहेत, हे हीखरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ज्या विभागात उक्त आगीच्या घटना घडल्या तेथील वनपाल व वनरक्षक यांच्यावर कारवाई करण्यासह विविध कारणांनी दिवसेंदिवस वनक्षेत्र कमी होत असताना सातत्याने लागणाऱ्या आगींमुळे वनांचे मोठे नुकसान होत असल्यामुळे याचा परिणाम जैवविविधतेवर होत असून त्यास प्रतिबंध बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) राज्यात दिनांक १ जानेवारी ते १५ एप्रिल, २०२५ या कालावधीमध्ये बीड जिल्हयात एकूण २५, सोलापूर जिल्हयात एकूण ३६ तर ठाणे जिल्हयामध्ये एकूण २०४ वनवणव्याच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) बीड वन परिक्षेत्रातील पालवन नियतक्षेत्रांतर्गत सह्याद्री देवराई प्रकल्पास माहे डिसेंबर, २०२५ मध्ये आग लागल्याची घटना घडलेली नाही. तथापी वन परिक्षेत्र अधिकारी, बीड वनक्षेत्रात मौजे पिंपळवाडी ता.जि.बीड येथे दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी आगीची घटना घडल्याचे कळविण्यात आलेले आहे. त्यामध्ये गवत व पालापाचोळा जळालेला असुन कोणत्याही प्रकारची पशुधन हानी वा जिवीत हानी झालेली नाही.

(३) दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी सोलापुर जिल्हयातील मंगळवेढा शहरा लगत वनविभागाच्या हद्दीतील

एकवीरा येथे वनक्षेत्रातून जाणाऱ्या विद्युत तारांच्या स्पार्कींग मुळे गवत पेटून सुमारे ३ हेक्टर क्षेत्र जळालेले आहे. झाडे जळाले नसून फक्त आगीची हाय लागलेली आहे.

(४) मंगळवेढा शहरालगत वनविभागाच्या हद्दीत असलेल्या एकवीरा वनक्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारची बेकायदा वृक्षतोड होत नाही. तसेच सदर ठिकाणी वॉल कंपाऊंड नसून चेनलिंक फेन्सिंग आहे. या ठिकाणी वनपाल, मंगळवेढा यांचे वनपरिमंडळ कार्यालय असून वन कर्मचारी यांची शासकीय निवासस्थाने तेथेच आहेत व ते वास्तव्यास आहेत. सदर क्षेत्रामध्ये विद्युत तारांच्या स्पार्किंगमुळे आग लागल्याची घटना घडली होती. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशामक दल मंगळवेढा यांना घटनास्थळी बोलावून वनपाल, वनरक्षक व वनमजूर यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने तात्काळ आग आटोक्यात आणून विझविली. त्यानंतर वनपाल व वनरक्षक यांनी वनअपराध प्रतिवृत्त अन्वये जळालेल्या क्षेत्राचा वनगुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(५) ठाणे वनविभागात माहे जानेवारी, २०२५ मध्ये मुरबाड, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण या विभागातील वनपट्टयांमध्ये ८ आगीच्या घटना घडलेल्या आहेत. परंतु वेळोवेळी वणवे लागून वनसंपदा नष्ट झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(६) वनवणव्यांच्या घटनांवर तत्परतेने कारवाई करण्यात येत असुन वेळीच वनवणवे आटोक्यात आणण्याबाबतचे प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच वनगुन्हे नोंद करुन चौकशी करण्यात येत आहे. वनविभागात जंगलात आग लागण्याच्या घटना रोखण्याकरिता अग्निरक्षक नेमणूक करून, वणवा प्रतिबंधक पथके स्थापन करुन, जाळरेषा घेण्यात येवून, तसेच जंगलातील आगींवर नियंत्रण करण्याकरिता गावागावात वनवणवा लागू नये याची खबरदारी घेण्याबाबत जनजागृती कार्यक्रम राबवून, भिंतीपत्रके लावून तसेच रात्रगस्त कार्यक्रम राबविण्यात येवून, त्याचप्रमाणे वनअधिकारी/ कर्मचारी तसेच संयुक्त वनव्यवस्थापन समिती सदस्याची भारतीय वन सर्व्हेक्षण पोर्टलवर फायर अलर्ट करिता नोंदणी करण्यात येवून, फायर अलर्ट ची तपासणी करुन कार्यवाही करण्यात येते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोहाडोंगरी (ता. ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथील प्रस्तावित लोहखनिज प्रकल्पाची मंजूरी रद्द करण्याबाबत

**(६) * २३२५० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहाडोंगरी (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) गावापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या डोंगर काचेपार या राखीव जंगलात शासनाने एका पोलाद कंपनीस लोहखनिज प्रकल्पासाठी जमीन दिली असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्प उभारणी प्रक्रियेस वन्यजीव संघर्ष आणि सदर प्रकल्पाची संवेदनशिलता विचारात घेऊन, स्थानिक नागरिक व वन्यजीव प्रेमी तसेच राज्य वन्यजीव मंडळाच्या तीन तज्ञ सदस्यांनी विरोध केला

असतांनाही शासनाने या लोहखनिज प्रकल्पास मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्ताव चर्चेला घेऊन अभ्यास समिती नेमून निर्णय पुढे ढकलण्यात आला त्याचप्रमाणे राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीनेही उक्त प्रकल्पाला दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत स्पष्ट नकार दिल्यानंतरही शासनाने सदर प्रस्ताव निर्णयासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे वर्ग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा जिल्ह्यांना जोडणाऱ्या ताडोबा-अंधारी व नवेगाव–नागझिरा व्याघ्र भ्रमण मार्गामध्ये सदर लोहाडोंगरी येथील प्रस्तावित लोहखनिज प्रकल्पामुळे वाघांसह राज्यातील सर्वाधिक घनतेच्या वन्यजीव संवर्धनावर गंभीर परिणाम होणार असून नैसर्गिक भ्रमणमार्ग बाधित होऊन मानव–वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होणार असल्याचे तसेच सदर प्रकल्पातून केवळ ३८ नोकऱ्या कायम स्वरूपी निर्माण होणार असून लोह उत्पादन अवघे १.१ दशलक्ष टन इतकेच मर्यादित असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त जंगलातील व्याघ्र भ्रमण मार्ग व जैवविविधतेचे संरक्षण लक्षात घेऊन लोहाडोंगरी येथील प्रस्तावित लोहखनिज प्रकल्पाची मंजूरी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३), (४) व (५) चंद्रपूर वनवृत्तातील ब्रम्हपूरी वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील मौजा लोहारडोंगरी गावातील लोहारडोंगरी ब्लॉक (३५.९४ हे. राखीव वन) M/s Sunflag Iron & Steel Core Limited यांना पर्यावरण व वातवरणीय बदल विभागामार्फत दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशान्वये वाटप करण्यात आले आहे. तथापि अद्याप सदर प्रकल्पाकरीता वन जमीन वळती करण्यात आलेली नाही.

सदर प्रकल्पास वन्यजीव प्रेमी यांनी विरोध केला आहे. दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी संपन्न झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या २२ व्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालावर दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी संपन्न झालेल्या राज्य वन्यजीवमंडळाच्या स्थायी समितीच्या पहिल्या बैठकीत चर्चा करण्यात आली असून त्रिसदस्यीय समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सखोल अभ्यास करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. तदनंतर दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी संपन्न झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या २५ व्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पास मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी व त्रिसदस्यीय समिती यांनी घालून दिलेल्या अटीच्या अधिन राहून पुढील कार्यवाहीसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे शिफारसीत करण्यात आले आहे.

सदर खाण प्रकल्प हा १२ वर्षाच्या कालावधीकरीता असून ३२ कायमस्वरुपी कर्मचारी व स्थानिक पातळीवर १२० व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून सदर खाण प्रकल्पातून वार्षिक १.१ लक्ष टन लोह खनिज उपलब्ध करणे अपेक्षित असल्याचे त्रिसदस्यीय समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील ई-सर्च यंत्रणा बंद झाल्याने मालमत्तेचे व्यवहार प्रलंबित राहिल्याबाबत

**(७) * २७३५९ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने विकसित केलेल्या ई-सर्च प्रणाली द्वारे जमीन सदनिका किंवा दुकानाचे जुने दस्तावेज व इंडेक्स यासारखी कागदपत्रे तपासण्यासाठी ऑनलाइन शोधण्याच्या सुविधेमुळे कोणत्याही मालमत्तेच्या व्यवहारापूर्वी त्या मालमत्तेची मालकी हक्कात झालेले बदल तपासणी आवश्यक असल्याने महत्वपूर्ण असलेली ई-सर्च यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड परिसरातील विविध प्रकारच्या मालमत्तेसंदर्भातील पूर्वी नोंदवलेले दस्त शोधण्यासाठी वापरण्यात येणारी नोंदणी विभागाची ई-सर्च ऑनलाईन यंत्रणा काही दिवसापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ऑनलाईन यंत्रणा बंद असल्याने मालमत्तेचे खरेदी विक्रीचे व्यवहार टायटल सर्च रिपोर्ट तसेच बँक वित्तीय संस्थांशी संबंधित कर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याने वकील, नागरिक, खरेदीदार व बँकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त यंत्रणा ठप्प झाल्याने उद्योग नगरी पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्तेचे व्यवहार थांबल्याने शासनाच्या महसूलावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ई सर्च यंत्रणा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंगराला (ता.तुमसर, जि. भंडारा) येथील सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत कागदोपत्री रोपवन दाखवून निधीचा केलेला अपहार

**(८) * २६४४० श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगराला (ता.तुमसर जि. भंडारा) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत वनविभागाच्या सामाजिक वनीकरण योजनेमध्ये एकूण ५० हजार रोपे तयार करण्यात आली असून तत्कालीन वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांने रोपवन न करताच कागदोपत्री रोपवन झाल्याचे दाखवून शासनाच्या करोडो रुपयाच्या निधीचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याकरिता ७ लाख ३० हजार रुपये इतका खर्च करण्यात आला असून सदर ५० हजार रोपापैंकी २६ हजार रोपे वन्यप्राण्यांनी नष्ट केली असल्याचे कागदोपत्री दाखवून शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत संस्थापक अध्यक्ष स्वराज्य युवा एकता फाऊंडेशन, तुमसर येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी आपले पोर्टलवर तक्रार केल्याने सामाजिक वनीकरण विभागाचे उपवनसंरक्षक यांनी दखल घेऊन त्याप्रकरणी चौकशी सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी रोपाची लागवड, संगोपन व संरक्षण यामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याने संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी (RFO) आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे रोपवाटिकेची दुरवस्था व स्थायी वस्तूंचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, डोंगराला (ता.तुमसर, जि.भंडारा) येथिल सामाजिक वनीकरण योजनेतील रोपवाटिकेतील अनियमिततेबाबत संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी (RFO) आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) होय, श्री. अमित मेश्राम, ता. तुमसर जि. भंडारा यांच्या आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, चंद्रपूर यांनी चौकशी करून त्यांचा चौकशी अहवाल उपवनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर यांच्याकडे दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ अन्वये सादर केलेला आहे.

(६) उपवनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर यांनी चौकशी अहवालाच्या निष्कर्षानुसार संबंधित तत्कालिन वन परिक्षेत्र अधिकारी, लाखणी व तत्कालिन वनरक्षक, डोंगराला रोपवाटिका, सामाजिक वनीकरण विभाग, भंडारा यांना दिनांक ०५ जानेवारी, २०२६ अन्वये कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे. त्यानुषंगाने संबंधितांचे खुलासे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ व दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. प्राप्त खुलाशांनुसार उपवनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर यांचेकडून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत**

**(९) * २२९८८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.संतोष**

**दानवे (भोकरदन), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात विशेषतः गोंदिया, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, लातूर, परभणी, नंदूरबार, रायगड, रत्नागिरी, जळगाव, गडचिरोली, सोलापूर, यवतमाळ, जालना, पुणे व पालघर येथे माहे सप्टेंबर ते ऑक्टोबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात जिवीतहानीसह शेतकरी व मच्छिमार यांची घरे, जनावरे, भात, नाचणी, कापूस इत्यादी शेतमाल, फळबागा, सुकी मच्छी तसेच खरडून गेलेल्या जमिनी इत्यादी स्वरुपाचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करून निधीही उपलब्ध करून दिला असला तरी ई-केवायसीसह तांत्रिक कारणास्तव लाभ न घेऊ शकलेल्या ५ लाख ४२ हजार १४१ शेतकऱ्यांचे तब्बल १६५ कोटी ७२ शासनाच्या तिजोरीतच पडून असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देतांना मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे मदत देण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली नाही, तसेच शेकडो पात्र शेतकऱ्यांची नावे नुकसानग्रस्तांच्या यादीत समाविष्ट केलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांची अनुदानाची प्रकरणे पूर्ण कागदपत्रांसह सादर असूनही संबंधित विभागांकडून वेळेत मंजुरी व निधी वितरण न झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकरी व मच्छिमार यांच्या नुकसानाबाबत पंचनामे करुन तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अतिवृष्टीमुळे व पुरामुळे बाधित शेतकऱ्यांचे पंचनामे करुन (ॲग्रीस्टॅक नोंदणी झालेल्या किंवा E-KYC प्रक्रिया पूर्ण केलेल्या) ९९ लक्ष पात्र शेतकऱ्यांना १५,६६१ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये (डी.बी.टी. प्रणालीद्वारे) निधी वितरीत करण्यात आलेला आहे. शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे पात्र शेतकऱ्यांची नावे जिल्ह्यांच्या संकेत स्थळावर त्या त्या वेळी प्रसिध्द करण्यात आली आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारनेर, कोपरगाव (जि.अहिल्यानगर) तालुक्यात अवैध वाळू उपसा व वाहतूक होत असल्याबाबत

**(१०) * २३०६२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील मांड ओहळ येथील नदीपात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या डंपरने (एम.एच.२२ ए.एन. ७१७१) बोकनकवाडी ते वासुंदा रोडवर दुचाकीला दिलेल्या धडकेत

श्री.संतोष नऱ्हे नामक तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी डंपर मधील वाळू रस्त्यावर खाली करून चालक फरार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कोपरगाव तालुक्यातील गोदावरी नदी पात्रातून दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान अवैध रेती उपसा व वाहतूक करीत असताना पोलीसांनी धाड टाकून वाहनासह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यातील अनेक नदीपात्रातून अवैध रेती उपसा व वाहतूक सर्रासपणे होत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त तालुक्यात अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक होत असल्याचे यापूर्वीही निदर्शनास आले असूनही त्याबाबत प्रशासनाला ग्रामस्थांनी व नागरिकांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी वाहन मालक व वाहन चालक यांचेविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०५, ३०३ (२), १०६ (१), २८१, १२५ (अ) (ब), ३०२ (४), ३ (५) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४ (अ) (ब) प्रमाणे दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी गु.र.नं.०३/२०२६ गुन्हा दाखल केलेला असून सदर दोन्ही आरोपींना दिनाक ८ जानेवारी, २०२६ रोजी अटक केली आहे. सदर वाहन (डंपर) क्रमांक MH-२२-AN-७१७१ पारनेर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात आहे. तसेच सदर वाहन मालक यांना अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी दंडात्मक नोटीस देण्यात आली आहे.

(३) दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ रोजी कुंभारी शिवार, ता. कोपरगाव येथे एक डंपर विनापरवाना वाळू वाहतूक करताना पोलीस विभागास आढळून आल्याने संबंधिताविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३२७/२०२५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे आहे.

(६) दिनांक १ एप्रिल, २०२५ ते दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत कोपरगाव तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण ४४वाहनांवर कारवाई करुन रक्कम रुपये ७९.८५ लाख दंड आकारण्यात आला असून एकूण २९ गुन्हे दाखल केले आहेत. अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या १५ व्यक्तीविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

दिनांक १ एप्रिल, २०२५ ते दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत पारनेर या तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या ११ वाहनांवर कारवाई करुन १४.२५ लाख दंड आकारुन ४ गुन्हे दाखल केले आहेत. ४ व्यक्तीविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

----------------

## अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात पात्र शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्याबाबत

**(११) * २३८६२ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात सन २०२२-२०२३ व २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, पूर व गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून यासाठी शासनाने सुमारे १५ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अनुदान मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात मंजूर अनुदानात २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा गैरव्यवहार ग्रामसेवक, तलाठी, तहसिलदार व कृषी विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाला असून बनावट लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान वर्ग करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अनुदान गैरव्यवहारात अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्याचे तत्कालीन तहसिलदार, तलाठी व इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग असून अनुदानाची रक्कम बनावट नावे दाखवुन नातेवाईकांच्या खात्यात जमा करणे, एकाच शेतकऱ्यांच्या नावे अनेकदा पैसे जमा करणे इत्यादी प्रकारे गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करून शेती नावावर नसलेल्या बोगस लाभार्थ्यांच्या नावे शासकीय निधी वळवून १ कोटी ३५ लाख रुपयांचा अपहार करण्यात आला असून, आरोपींच्या अटकेतील दिरंगाईमुळे तपासात अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी मुख्य दोषी असलेल्या दोन्ही तहसीलदारांना वगळून इतर ७६ कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले असले तरी अद्यापपर्यंत अपहाराची रक्कम वसूल करण्यासंदर्भात कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, नैसर्गिक आपत्ती मदत वाटपाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी व अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनामार्फत काही विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत काय,

(७) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह अपहाराची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय. सन २०२२ ते २०२४ या कालावधीत जालना जिल्हयात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याकरीता रु.१५३३.७३ कोटी रुपये अनुदान मंजूर केले होते.

(२) होय.

(३) होय.

(४) या प्रकरणात २८ दोषी कर्मचा-यांवर अंबड पोलीस स्टेशन येथे दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ रोजी गुन्हा क्र. ४५३/२०२५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. २८ कर्मचाऱ्यांपैकी २७ कर्मचारी यांचेसह पोलीस तपासात इतर निष्पन्न झालेले ९ आरोपी अशा एकुण ३६ आरोपींना अटक करण्यात आली.

(५), (६) व (७) सदर प्रकरणी १) गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांसह एकूण ३२ कर्मचा-यांना (महसूल) निलंबित करण्यात आले आहे. २) तत्कालीन २ तहसीलदारांसह एकूण ५५ अधिकारी/कर्मचारी यांची संयुक्त विभागीय चौकशी सुरु आहे. ३) जिल्हा परिषदेतंर्गत ५ ग्रामंपचायत अधिकारी यांना निलंबित करण्यात आले व ६

जणांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ४) कृषि विभागातील २ कृषि सहायक यांनाही निलंबित करण्यात आले असून त्यांचीही विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ५) अपहाराची रक्कम वसूल करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी जालना यांचे स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील अकृषिक मंजूर रेखांकनातील ले-आऊटमधील खुल्या जागांच्या बेकायदेशीर खरेदी-विक्री व व्यवहार होत असल्याबाबत

**(१२) * २५५५५ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात अकृषिक मंजूर रेखांकनातील ले-आऊटमधील खुल्या जागांची बेकायदेशीर खरेदी-विक्री व व्यवहार विकासकाकडून होत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे प्राप्त झाली असून याबाबत दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात आतापर्यंत किती ठिकाणी खुल्या जागांची बेकायदेशीर विक्री अथवा व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बेकायदेशीर व्यवहारांमधील विकासक, एजंट व संबंधित व्यक्तींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने अशा तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने अशी प्रकरणे तपासून त्यावर योग्य ती कार्यवाही करणेच्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १३ जानेवारी, २०२६ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) सोलापूर जिल्हयातील खालील तीन ठिकाणी बेकायदेशिर विक्री व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

१. मौजे भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर.

२. मौजे भोसरे माऊली नगर, ता. माढा, जि. सोलापूर.

३. सोलापूर शहर, अक्कलकोट रोड, यशराज नगर.

(३) नागरिकांकडून एकूण १० तक्रारी अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी ०२ प्रकरणात बेकायदेशीर फेरफार नोंदी पुनर्विलोकनात घेऊन रद्द करणेची कार्यवाही पूर्ण झाली आहे. तसेच, सदर प्रकरणात दोषी आढळून आलेले संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, दस्तलेखनिकावर कारवाई करण्याबाबत सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर यांना अवगत केलेले आहे. उर्वरित एका प्रकरणात फेरफार नोंदी पुनर्विलोकनात घेऊन रद्द करणेची कार्यवाही उपविभागीय अधिकारी स्तरावर चालू आहे. इतर ०७ तक्रारी अर्जावर स्थानिक क्षेत्रीय स्तरावर चौकशीचे कामकाज चालू असून चौकशी अंती योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध कारणांमुळे वाघांचा मृत्यू होत असल्याबाबत

**(१३) * २४१०३ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या (एनटीसीए) अहवालानुसार सन २०२५ मध्ये देशात एकूण १६६ वाघांचा विविध कारणामुळे मृत्यू झाला असून त्यापैकी महाराष्ट्रात ३८ वाघांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यातील सेलू (मुरपाड) तसेच पेंच व्याघ्र प्रकल्पातील देवलापार परिसरात वाघ व वाघिणीचा मृत्यू शेतातील अवैध विद्युत प्रवाहाच्या (Electric Fencing) धक्क्याने झाला असून १३ दिवस उलटूनही संबंधितावर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बल्लारशा-गोंदिया रेल्वेमार्ग हा वन्य प्राण्यांसाठी भारतातील सर्वाधिक धोकादायक मार्ग असून या मार्गावर नेहमीच वाघांच्या मृत्युच्या घटना घडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन्यप्राणी रेल्वे अपघात रोखण्यासाठी या मार्गासाठी केंद्रीय पर्यावरण वने व हवामान बदल विभाग तसेच रेल्वे विभागाने एक समिती स्थापन केली व समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असतानाही त्यातील शिफारशींची अद्यापही अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात वाघांच्या अधिवासातील जागेची कमतरता, मानवी हस्तक्षेप, संघर्ष तसेच नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे वाघांच्या मृत्यू याचा परिणाम राज्यातील वन्यजीव संवर्धन व जैवविविधतेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वीज प्रवाहातून होणाऱ्या वाघांच्या शिकारी, वाहन धडक वा रेल्वेच्या धडकेत वाघांच्या मृत्युच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी विशेष कृती दल (Special Task Force) स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) राज्यात सन २०२५ मध्ये नैसर्गिकरित्या-२८, अपघातात-८, विद्युतप्रवाहामुळे-४ व शिकारीने-१ अशा विविध कारणांमुळे एकूण ४१ वाघांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) वर्धा वनविभागातील वर्धा नियतक्षेत्र सेलु मुरपाड येथे पोथरा येथे पोथरा नदीच्या कालव्यात वाघ (मादी) मृत

अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. प्रस्तुत प्रकरणी दिनांक ३१.१२.२०२५ रोजी वन गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

(३) बल्लारशाह-गोंदिया रेल्वे मार्ग हा चंद्रपूर, ब्रम्हपुरी, मध्य चांदा, गोंदिया, वडसा या वन विभागांच्या क्षेत्रातुन तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातुन जातो.

सन २०११ ते सन २०२५ या कालावधीत सदर रेल्वे मार्गावर ५ वाघांचा मृत्यु झाला आहे.

(४) वन्यप्राण्यांचे रेल्वे अपघातात होणारे मृत्यु रोखण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांनी दिनांक १५.१२.२०१८ च्या पत्रान्वये रेल्वे विभागास खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याबाबत कळविले होते. सदर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने रेल्वे विभागाशी क्षेत्रिय स्तरावर पाठपूरावा करण्यात येत आहे.

- नव्याने प्रस्तावित करण्यात येणाऱ्या रेल्वे मार्गावरील जंगलामध्ये वन्यप्राण्यांना ये-जा करण्यासाठी अंन्डरपास तसेच ओवरपास तयार करणे.
- रेल्वे प्रवाशांद्वारे रेल्वे रुळावर फेकण्यात येत असलेल्या खाद्यपदार्थासंबंधित योग्य विल्हेवाट लावण्याची उपाययोजना करणे.
- संवेदनशील क्षेत्रात रेल्वेचा वेग ४० कि.मी. प्रति तास ठेवणे.

(५) वन विभागामार्फत वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे करण्यात येणाऱे प्रभावीपणे संवर्धन यामुळे वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

वन्यप्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे सदर वन्यप्राणी त्यांचे नैसर्गिक अधिवासाच्या शोधात स्थलांतर करीत असतात सदर प्रक्रियेमुळे जैवविविधता समतोल साधला जातो. सदर प्रक्रिये दरम्यान मानव-वन्यप्राणी संघर्ष निर्माण होण्याची शक्यता राहते.

(६) विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.

विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सनियंत्रण करण्यात येते.

रॅपिड रेस्क्यु युनिट, टीसीसी व हत्ती मागोवा दलासाठी ३६८ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

वाघांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.
- अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.
- अतिसंवेदशिल क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे तयार करण्यात आले आहेत.
- राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्यावत माहिती ठेवणेकरीता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे व सदर कक्षाचे बळकटीकरण करण्यात येत आहे. तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.

- अतिसंवेदनशिल क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके तयार करण्यात आले असून त्याद्वारे, येणा-या जाणा-या वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते.
- परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोव्याचा पंधरवडी कार्यक्रम राबवून त्यांच्या अस्तित्वाबाबतची माहिती घेण्यात येते. गावालगत असलेल्या मुसाफिर लोकांचे डेरे तपासणी करण्यात येते व त्यांचे हालाचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- वाघाचे भ्रमणमार्ग, पाणवठे व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालीवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विष प्रयोग होऊ नये याकरीता नियमीत पाणवठ्याची तपासणी केली जाते. या व्यतिरीक्त मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने पाणवठ्याकडे जाणा-या मार्गावर शिकारी लोकांव्दारे लोखंडी ट्रॅप लावले नसल्याची खातरजमा करण्यात येते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुही (जि. नागपूर) तालुक्यातील खत विक्रेत्यांकडून रासायनिक खतांवर करण्यात येणारी सक्तीची लिंकींग बंद करण्याबाबत

**(१४) * २३०३६ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि. नागपूर) तालुक्यातील खत विक्रेत्यांकडून युरिया, डीएपी, १०:२६:२६ यांसारखी अत्यावश्यक रासायनिक खते विक्री करताना न लागणारा व महागडा माल लिंकींग स्वरूपात सक्तीने देण्यात येत असून नॅनो युरिया, नॅनो डीएपी, विद्राव्य खते व मायक्रोन्युट्रिएंट्स इत्यादी अवाजवी दराने शेतकऱ्यांना विक्री करून त्यांचे आर्थिक शोषण करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुही तालुका ॲग्रो डिलर्स असोसिएशन, सरपंच संघटना व शेतकऱ्यांच्या वतीने रासायनिक खतांवरील सक्तीची लिंकींग कायमस्वरूपी बंद करण्यात यावी, या मागणीसाठी मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कुही (जि.नागपूर) तालुक्यातील खत विक्रीत्यांकडून देण्यात येणारे रासायनिक खतांवरील सक्तीची लिंकींग कायमस्वरूपी बंद करुन या प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) नाही.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, नागपुर यांच्या अध्यतेखाली सर्व खते उत्पादक प्रतिनीधी, नागपुर येथिल खत वितरक व नागपुर जिल्हा येथील डिलर असोशिएसन प्रतीनिधी आणि जिल्ह्यातील सर्व गुण नियंत्रण निरीक्षक यांची संयुक्त सभा दिनांक १५/०१/२०२६ घेण्यात आली. जिल्हाधिकारी, नागपुर यांनी सर्व उत्पादक, वितरक व विक्रेता यांना कुठल्याही प्रकारची लिंकीग करू नये तसेच खत सक्तीच्या (लिंकिंगच्या) तक्रारी आढळल्यास किंवा तपासणीत तथ्य सापडल्यास संबंधित कंपनी आणि वितरकावर खत नियंत्रण आदेश, १९८५ व अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ नुसार कार्यवाही करण्यात येईल, असे निर्देश दिले.

कुही तालुक्यातील एकूण ११२ खत विक्रेत्यांची दुकाने व गोदामांची गुण नियंत्रण निरीक्षकामार्फत तपासणी करण्यात आली असून यातील २६ खत विक्रेत्यांकडे अनियमितता आढळल्याने कारणे दाखवा नोटीस

बजावण्यात आली व खुलासा मागविण्यात आला, त्या पैकी १६ खत विक्रेत्यांचे खुलासे समाधानकारक असल्याने सदर विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली, तर उर्वरित १० विक्रेत्याकडे गंभीर त्रुटी आढळून आल्यामुळे त्यांची सुनावणी परवाना अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नागपूर यांचे समक्ष घेण्यात आली. या सुनावणी मध्ये १० विक्रेत्यांचे खत परवाने निलंबित करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील मग्रारोहयो अंतर्गत कागदोपत्री वृक्ष लागवड करून देयके उचलल्याबाबत**

**(१५) * २५१३५ श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील मग्रारोहयो अंतर्गत सामाजिक वनीकरण विभागाने सन २०२५ मध्ये ३ कोटी ६३ लक्ष रूपयांचे कागदोपत्री वृक्ष लागवड करून देयके उचलल्याची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे जानेवारी, २०२६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्ष लागवड न झाल्याने, जागेवर वृक्ष उपलब्ध नसणे तसेच जिओ टॅगिंगप्रमाणे वृक्ष न दिसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या उद्देशाने सदरील योजना राबविण्यात आली असून ती योजना सफल न होता शासनाचे कोटयवधी रूपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार परभणी जिल्हयातील मग्रारोहयो अंतर्गत सामाजिक वनीकरण विभागाने ३ कोटी ६३ लक्ष रूपयांचे कागदोपत्री वृक्ष लागवड करून देयके उचलल्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.

सामाजिक कार्यकर्ते श्री.मुकुंद कुलकर्णी यांची दिनांक ३१.१.२०२६ रोजीची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना दिनांक १८.२.२०२६ रोजी प्राप्त झाली असून, सदर तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडून दिनांक १८.२.२०२६ रोजी विभागीय वन अधिकारी (सा.व.), परभणी यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी प्राप्त झालेली आहे.

(२), (३) व (४) सन २०२५-२६ मध्ये परभणी वन विभागांतर्गत कार्यरत परभणी, गंगाखेड, जिंतूर, सेलू, सोनपेठ व पूर्णा या परिक्षेत्रामध्ये एकूण ६९३ लाभार्थ्यांच्या ४३८.५४ हे. क्षेत्रावर वृक्षलागवड करण्याकरिता जुलै, २०२५ते डिसेंबर, २०२५च्या कालावधीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. सदर कामांपैकी ऑक्टोंबर, २०२५ ते जानेवारी, २०२६ या कालावधीत २३१ कामांवर लागवड पूर्व कामे जसे की, जागेची सफाई करणे, खड्डे खोदणे या कामांवर मजूरांचे मस्टर काढण्यात आले असून त्याकरिता रु.९०.१२ लक्ष खर्च थेट मजूरांच्या खात्यावर आहरित करण्यात आला आहे. तथापि, सदर लाभार्थी शेतकऱ्यांकडून त्यांच्या शेतावर अद्यापपर्यंत कोणतेही वृक्षलागवड केलेली नाही. तसेच त्यासाठी कोणतेही देयके अदा करण्यात आलेले नाही. सदर लाभार्थी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पुढील लागवडीची कामे केली जाणार आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुसद (जि. यवतमाळ) येथील प्रकल्प कार्यालयातील भोजन कंत्राट पुरवठा निविदेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१६) * २२९७३ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील प्रकल्प कार्यालयातील भोजन कंत्राट पुरवठा निविदेत अपर आयुक्त, अमरावती, कार्यालयात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती विभागांतर्गत एकूण सात प्रकल्प कार्यालय येत असुन त्यामध्ये पांढरकवडा, पुसद, धारणी, कळमनूरी, अकोला, छत्रपती संभाजीनगर, किनवट हे कार्यालय येत असुन पुसद प्रकल्पात भोजन पुरवठा निविदेत बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर केले असतानाही त्याला मंजुरी देण्यात येऊन याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवून प्रशासकीय मान्यताही घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी जबाबदार अपर आयुक्त श्री. जितेंद्र चौधरी यांच्यावर कठोर कारवाई न करता त्यांची केवळ नाशिक येथे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या सहआयुक्त पदावर बदली करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या काही विभागात वारंवार गैरव्यवहार होत असल्याने शासनाचे त्याचबरोबर नागरिकांचेही मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, पुसद (जि.यवतमाळ) येथील प्रकल्प कार्यालयातील भोजन कंत्राट पुरवठा निविदेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अपर आयुक्त, अमरावती यांच्यावर कारवाई करण्यासह विभागातील असे गैरव्यवहार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) होय.

अपर आयुक, अमरावती अंतर्गत पुसद प्रकल्पातील शासकीय वसतीगृहातील भोजन ठेका पुरवठ्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. अपर आयुक्त यांच्या प्रस्तावानुसार निविदेतील न्युनतम दरधारकास व येणा-या खर्चासाठी शासनाने दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी वित्तीय मान्यता दिली होती. मात्र यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत सदर न्युनतम दरधारक संस्थेने सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून आल्याने संबंधित संस्थेस कार्यारंभ आदेश देण्यात आले नाही. तसेच त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती येथे प्रथम खबरी अहवाल दाखल केलेला आहे. तसेच शासनाने यासंदर्भात दिलेली वित्तीय मान्यता दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजीच्या आदेशान्वये रद्द केली आहे. प्रस्तूत प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.
(३) सदर प्रकरणी शासनाकडून तत्कालीन अपर आयुक्त, तत्कालीन उपायुक्त व तत्कालीन सहाय्यक आयुक्त (लेखा), यांच्याविरुद्ध मनासे (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ खाली दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावून एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच निष्पक्ष चौकशी होण्यासाठी तत्कालीन अपर आयुक्त व उपायुक्त, अमरावती यांच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये बदल्या करण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) तत्कालीन अपर आयुक्त, अमरावती व अन्य संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

अन्य प्राप्त तक्रारी बाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतकरी आत्महत्येत झालेल्या वाढीबाबत**

**(१७) * २३०२२ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः पश्चिम विदर्भातील २००९ शेतकऱ्यांनी तर मराठवाड्यात ११२९ शेतकऱ्यांनी तसेच जळगाव जिल्हयात सन २००९ ते २०२५ या कालावधील एकूण २,७८३ शेतकरी आत्महत्या झाल्याची नोंद असून सन २०२५ मध्ये सर्वाधिक उच्चांक २०० आत्महत्या नोंदविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चालू वर्षात पश्चिम विदर्भ व मराठवाडा विभागात १ हजार ९८७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून विभागात दररोज सरासरी ३ शेतकऱ्यांनी आपली जिवन यात्रा संपवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढते उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा, सततच्या नापिकीपणा, शेतीमालाला हमी भाव न मिळणे, निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान तसेच अपुऱ्या शासकीय मदतीमुळे शेतकऱ्यांवर मानसिक ताण वाढणे, बँकाच्या जाचक अटी व कर्जवसुलीच्या तगाद्यामुळे टोकाचे उचलेले पाऊल या व अशा अनेक कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातत्याने होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांमुळे ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती बिघडत असून शेतकरी कुटुंबांवर उपासमारीची व स्थलांतरणाची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत कर्जमाफी, आपत्ती निवारण आराखडा राबविणे, हमीभाव, पीक विमा, मानसिक आरोग्य सहाय्य या सारखी प्रभावी योजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) हे अंश:त खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

(५) प्रचलित धारेणानुसार शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रकरणी रुपये १.०० लक्ष इतकी मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसांना देण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना चादर, बेडशीट, ब्लँकेट पुरविण्याबाबत

**(१८) * २३८८० श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना चादर, बेडशीट, ब्लँकेटचा पुरवठा आवश्यक असल्याने खरेदीसाठी मंजूरी दयावी, असा प्रस्ताव पुणे येथील समाजकल्याण आयुक्तांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने त्यानुसार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी ११ कोटी ८९ लाख ६८ हजार ८२६ रुपयांच्या साहित्य खरेदीला प्रशासकीय मान्यता दिली असून आयुक्तांनी ई-निविदा किंवा जेम पोर्टलवरुन खरेदीची प्रशासकीय कार्यवाही विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन पूर्ण करावी असे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त यंत्रणेकडून याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसून त्यातच आता शासनाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजीची प्रशासकीय मान्यता रद्द केली असल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काढलेले आदेश रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांना तात्काळ आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये विहित केलेल्या तरतुदीनुसार विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा-या सोयी-सुविधा अंतर्गत चादर, बेडशीट, ब्लँकेट या वस्तुची खरेदी राखीव ठेवण्यात आलेल्या महामंडळाकडून करण्याकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(५) विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा अंतर्गत चादर, बेडशीट, ब्लँकेट हे साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी आयुक्तालय, समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड वनपरिक्षेत्रातील पाणीपुरवठ्याच्या देयकात केलेला गैरव्यवहार

**(१९) * २३५०६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड वनपरिक्षेत्रातील वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी ज्या टँकरने २४००० लिटर पाणीपुरवठा केल्याचे देयके काढण्यात आली, त्याची तपासणी केली असता तो क्रमांक दुचाकीचा असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीवरून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वनपरिक्षेत्रातील कृष्णापूर वर्तुळातील पारडी बीटच्या कक्ष क्रमांक ४५५, व ४५६ मधील नैसर्गिक आणि कृत्रिम पाणवठे पाणी टंचाई काळात वन्यप्राण्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी लावण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी वर्षभर टँकरने पाणीपुरवठा सुरू असल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याची तक्रार संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ अधिकारी यांचेकडून याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) श्री. गजानन नारायण वानखडे, रा. उमरखेड, जि. यवतमाळ यांचे दिनांक ०२.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विविध तक्रारीपैकी अनुक्रमांक ३ नुसार सदर बाबतीत तक्रार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) उप विभागीय वन अधिकारी, उमरखेड यांनी केलेल्या चौकशीवरुन उमरखेड वनपरिक्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांना संबंधित प्रकरणाबाबत खुलासा सादर करणेकरीता कारणे दर्शक सुचनापत्र बजाविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी उपस्थित केलेल्या मुद्दाचे गांभीर्य लक्षात घेता शासन प्राथम्याने कार्यवाही करीत असून संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन एक महिन्याच्या आत शासनास अहवाल सादर करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सुचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारणी (जि.अमरावती) येथील आदिवासी विकास विभागाच्या एकात्मिक प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये अंडी व केळी पुरवठ्यात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) * २३०२७ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) येथील आदिवासी विकास विभागाच्या एकात्मिक प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांना अंडी पुरवठा न करता पुरवठादाराने धारणी एकात्मिक प्रकल्प कार्यालयातील अधिकारी, लेखापाल आणि भांडारपाल यांच्या संगनमताने बनावट देयके सादर करून जवळपास ९० लाख रुपयांची देयके श्री स्वामी समर्थ सप्लायर्स सोलापूर यांच्या नावे मंजूर करून ९० लाख रुपयांची उचल करून शासनाची फसवणूक

केली असल्याचे दिनांक, ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आश्रमशाळाना केळीचा पुरवठा न करताच पुरवठादाराने बनावट देयकांच्या आधारे लाखो रुपयांची उचल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत कोणतेही कागदपत्र मिळू नये यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रकल्प कार्यालयातून आधी अंडी आणि नंतर केळी पुरवठयाच्या गैरव्यवहाराची नस्ती गायब केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चोकशीच्या अनुषंगाने धारणी एकात्मिक प्रकल्प कार्यालयातील संबंधित दोषी अधिकारी, लेखापाल, भांडारपाल व कर्मचाऱ्यावर तसेच आश्रमशाळांना अंडी व केळी पुरवठा करणाऱ्या पुरवठादार आणि कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, धारणी यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार अंड्याच्या प्रत्यक्ष पुरवठ्यापेक्षा जास्त रकमेची देयके अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंडी-केळी पुरवठ्याबाबतच्या नस्तीची प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, धारणी यांच्या कार्यालयातून चोरी झाल्याचे निदर्शानास आल्यानंतर याबाबत धारणी पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रकल्प कार्यालय स्तरावर चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली असुन समितीने चौकशी अहवाल सादर केला आहे. अपर आयुक्त स्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात आली असून या समितीचा अहवाल अप्राप्त आहे.
(५) प्रकल्प अधिकारी, धारणी यांनी त्यांचे स्तरावरुन केलेल्या चौकशीचे आधारे तत्कालीन वरिष्ठ लेखापाल, तत्कालीन प्रभारी चौकीदार व तत्कालीन कनिष्ठ लिपिक (नस्ती चोरीला गेली त्यावेळचे संबाधित लिपिक) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन खुलासा मागविण्यात आला आहे. सदर कर्मचा-यांपैकी तत्कालीन वरिष्ठ लिपिक व तत्कालीन प्रभारी चौकीदार यांना निलंबित करण्यात आले असुन कनिष्ठ लिपिक हे सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांचे प्रकरणी खुलासा मागविण्यात येवुन त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.
(६) निरंक.

-----------------

## वायगांव निपाणी (ता. देवळी, जि. वर्धा) येथील शेतकऱ्यांना क्षेमा जनरल इन्शुरन्स लिमिटेड कंपनीने पिकविमा नाकारल्याबाबत

**(२१)** * **२४४२८ श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वायगांव, निपाणी (ता. देवळी, जि. वर्धा) येथील शेतकऱ्यांनी खरीप हंगामात सोयाबीन व कापूस पिकांसाठी क्षेमा जनरल इन्शुरन्स लि. कंपनीकडून पीकविमा काढला होता, परंतु अतिवृष्टीमुळे प्रत्यक्षात पिकांचे गंभीर नुकसान झाल्याची सर्व माहिती व लोकेशन फोटोसह ऑनलाईन तक्रारी दाखल केल्यानंतरही कंपनीने संबंधित शेतकऱ्यांना “No Loss” (नुकसान नाही) असे संदेश पाठवून नुकसानभरपाई नाकारली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसानीच्या सर्वेक्षणाच्या आधारे नुकसान भरपाई दिली आहे तरी या विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना पीकविमा नाकारल्याने शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकडून क्षेमा जनरल इन्शुरन्स लिमिटेड कंपनीविरोधात पिकविमा नाकारल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी विभागाने अथवा जिल्हास्तरीय विमा तक्रार निवारण समितीने या तक्रारींची चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न दिल्याबाबत क्षेमा जनरल इन्शुरन्स लि. कंपनीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ करिता उत्पादनावर आधारित सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजनेच्या कार्यान्वयनाकरिता वर्धा जिल्ह्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनीची निवड राज्य शासनाने केली असून, वर्धा जिल्ह्यात सदर कंपनीकडून योजना राबविण्यात येत आहे.

क्षेमा जनरल इन्शुरन्स लि. कंपनी ही विमा कंपनी राज्य शासनाने नियुक्त केलेली नाही. मात्र, वर्धा जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी सदर कंपनीमार्फत खाजगीरित्या पीक विमा काढला आहे. या कंपनीस शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या तरतूदी लागू होत नाहीत. काही शेतकऱ्यांनी स्वतंत्रपणे या खाजगी विमा कंपनीकडून पीक विमा घेतला असल्याने, सदर कंपनीच्या तरतूदीनुसार पीक नुकसान भरपाई देण्यात येते. या कंपनीने नुकसान भरपाई देणे नाकारली असल्याच्या तक्रारी क्षेत्रीय व जिल्हा स्तरावर प्राप्त झाल्या आहेत.

(४) शेतकऱ्यांनी खाजगीरित्या घेतलेल्या पीक विम्यासंदर्भात नुकसान भरपाईच्या तक्रारींचे निराकरण कंपनीचे स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र तसेच, विमा लोकपाल (Insurance Ombudsman) व भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण यांच्याद्वारे केले जाते.

मात्र, सदर प्रकरणी तपासणी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना आयुक्त, कृषि यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दातीवरे व खार्डी (जि.पालघर) परिसरात बेकायदा रेती उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याबाबत

**(२२) * २५९६९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वैतरणा खाडीतील दातीवरे व खार्डी परिसरात विना परवाना रात्रीच्या वेळी रेती माफियांकडून दररोज सात ते आठ बोटी सक्शन पंप लावून हजारो ब्रास रेतीचे उत्खनन, तस्करी व विक्री करण्यात येत असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात बेकायदा रेती उपशामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयाच्या महसुलाचे नुकसान झाले असून व बेसुमार उत्खननामुळे नदीचे पात्र रुंद होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) पालघर तालुक्यातील दातिवरे व खार्डी परिसरात विनापरवाना रात्री उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक१० डिसेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भरारी पथकाने सदर ठिकाणी अचानक भेट दिली असता त्या ठिकाणी १ रिकामी बोट, २ सक्शन पंप व ३ कामगार आढळून आले. तथापि,भरतीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तींनी बोट व सक्शन पंप पळवून नेले व कामगारही पळून गेले.

सदर ठिकाणी रात्रीच्या वेळी थोड्या फार प्रमाणात रेती उत्खनन करुन चोरटी वाहतुक करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु त्यावर गौणखनिज भरारी पथकाकडून वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

तसेच खाडीपात्र रुंद होवून पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) मौजे दातिवरे व खार्डी येथील वैतरणा खाडी क्षेत्रामध्ये मंडळ अधिकारी व तलाठी यांचे पथक नेमलेले असुन रेती उत्खनन होऊ नये यासाठी दक्षता घेतली जात आहे. जिल्हाधिकारी गौणखनिज भरारी पथकाकडून तसेच मंडळ अधिकारी व तलाठी यांचेद्वारे खार्डी व दातिवरे परिसरात नियमित भेट देण्यात येते व सद्यस्थितीत सदर ठिकाणी कोणतेही उत्खनन व वाहतुक होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळांतर्गत प्रलंबित कर्ज प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत

**(२३)** * **२४७१९ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात मातंग समाजातील सुशिक्षित बेरोजगारांनी उद्योग उभारणीसाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाकडे सादर केलेले ८१ कर्ज प्रस्ताव बँकांच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा निवड समितीमार्फत शिफारस केलेले व बँकांकडे मंजुरीसाठी पाठवलेले प्रस्ताव बँकांकडून विविध तांत्रिक त्रुटी दाखवुन प्रलंबित राहत असल्यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामंडळाकडून वेळोवेळी पाठपुरावा करूनही बँकांकडून कर्ज वाटपास विलंब केला जात असल्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महामंडळाचे कर्ज प्रस्ताव विनाकारण प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) बँकेकडे प्रलंबित असलेली कर्ज प्रकरणे यासाठी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाकडून संबधीत बॅकांना प्रत्यक्ष भेटी देऊन, पत्र व्यवहार व ई-मेल द्वारे मंजुरीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

(३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली “जिल्हा स्तरीय समिती” मध्ये सदरची बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे, त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी बँकाना कर्ज प्रकरणे तात्काळ निकली काढण्याबाबत आदेश दिले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईसह कोकणातील सागरीक्षेत्रात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या टॉलर्सवरील दंडाची रक्कम वाढविण्याबाबत**

**(२४) * २३२५४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह कोकणातील सागरीक्षेत्रात पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांसाठी १२ नॉटीकल मैल राखीव आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या राखीव क्षेत्रात काही टॉलर्स बेकायदेशीर पध्दतीने मासेमारी करीत असल्याने ६ टॉलर्स, सहाय्यक मत्स्यव्यवसाय अधिकारी पालघर यांनी पकडले असल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या मालकांना मत्स्यव्यवसाय विभागाकडून एक लाख रुपयांचा दंड ते सहज भरु शकत असल्याने ते पुन्हा प्रतिबंधित क्षेत्रात येवून मासेमारी करण्याचे त्यांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या टॉलर्सवरील दंडाची रक्कम पाच लाख रुपये करुन त्यांची प्रतिबंधित क्षेत्रातील घुसखोरी रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) Exclusive Economic Zone and Other Maritime Zones Act, १९७६ अन्वये १२ नॉटीकल मैल पर्यंतचे अंतर राज्याचे जलधी क्षेत्र म्हणुन घोषीत करण्यात आलेले असुन सदरच्या क्षेत्रामध्ये मासेमारी बाबतचे नियमन करण्याचा अधिकार राज्य शासनास देण्यात आलेला आहे. सदरच्या क्षेत्रात राज्यातील मच्छिमार व मासेमारी नौका मासेमारी करत असतात.

(२) होय हे खरे आहे.

दिनांक १३/१२/२०२५ रोजी पालघर जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात गस्ती नौकेद्वारे प्रभावी गस्त घालत असताना या क्षेत्रात ६ अनधिकृत मासेमारी नौकांमार्फत घुसखोरी केलेली असल्याचे निदर्शनास आलेले होते. सदर ६ अनधिकृत मासेमारी नौकांवर सागरी कायद्यातील तरतुदीन्वये कठोर कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ कायद्यातील तरतुदीन्वये ट्रॉलींग मासेमारी व पर्ससीन मासेमारीच्या नियमनाचे उल्लघंन केल्याचे निदर्शनास आल्यास पहिल्या गुन्हासाठी एक लाख रुपये दंड, दुस-या गुन्हासाठी तीन लाख रुपये दंड व तिस-या आणि त्यानंतरच्या गुन्हासाठी सहा लाख रुपये दंड लादण्याची तरतुद आहे.

(४) सागरी कायद्यातील तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागाकडे उपलब्ध असलेल्या गस्ती नौकेद्वारे राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावी गस्त घालण्यात येत आहे. तसेच ड्रोन आधारित देखरेख व डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली सुध्दा भाडेपट्टीने घेऊन एकुण ९ ड्रोनवरुन यंत्रप्रणालीद्वारे मासेमारी नौकांवर देखरेख ठेवुन अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती प्राप्त करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२५) * २३२७३ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटेवाडी (ता.कर्जत, जि.अहिल्यानगर) येथे एका आदिवासी महिलेचे निधन झाल्यानंतर दोन दिवसानंतरही अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध नसल्याने आदिवासी बांधव संबंधित महिलेचा मृतदेह कर्जत तहसील कार्यालयाच्या परिसरात अंत्यविधीसाठी आणल्याचे माहे, सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुष्यभर गरिबी, उपेक्षा आणि संघर्ष अनुभवल्यानंतरही आदिवासी बांधवांच्या यातना मृत्यूनंतरही संपत नसल्याचे ह्या घटनेवरून दिसून येत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२), (३) व (४) पाटेवाडी ग्रामपंचायत ता. कर्जत येथे सदर आदिवासी महिलेचे निधन दिनांक २२.०९.२०२५ रोजी झाले. पाटेवाडी ग्रामपंचायत येथे आदिवासी बांधवांचे यापूर्वी वनविभागाच्या जागेत अंत्यविधी करण्यात येत असत. परंतु, एका स्थानिक नागरिकाच्या तक्रारीमुळे सदर मृत महिलेच्या अंत्यविधीस उशिर झाला. सदर अंत्यविधी हा दिनांक २३.०९.२०२५ रोजी झाला.

ग्रामपंचायत पाटेवाडी यांनी यासंदर्भात तात्काळ ठराव करुन पंचायत समिती, कर्जत कार्यालयामार्फत तहसिलदार,कर्जत यांच्याकडे स्मशानभुमीच्या जागेसाठीचा रितसर प्रस्ताव सादर केला आहे.

तसेच, अहिल्यानगर जिल्हयातील अन्य गावातील ज्या गावांमध्ये स्मशानभूमी/ दफनभूमी नाही अशा गावांची माहिती संकलित केली आहे.

ग्रामविकास विभागाच्या मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या गावांतर्गत मुलभुत सुविधा योजनेंतर्गत दिनांक २३.०२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्या गावांमध्ये स्मशानभुमीचे काम मंजूर असेल तरच अशा गावांमध्ये अन्य विकास कामांना प्राधान्य दिले जाईल, असा शासन निर्णय घेण्यात आला आहे.

आणखी असे की, जिल्हा स्तरावरील जनसुविधा योजनेच्या माध्यमातून जागा उपलब्ध करुन देण्याची देखील तरतूद आहे.

ज्या गावांमध्ये स्मशानभुमीसाठी शासकीय जागा उपलब्ध नाही, अशा गावांमध्ये एक विशेष मोहिम राबविण्याच्या सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी यांना दिनांक २०.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे भेंडाळा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गट क्रमांक २१४ मधील जमिनीची बेकायदा केलेली विक्री**

**(२६) * २३८६७ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भेंडाळा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गट क्रमांक २१४ मधील ३१ एकर १९ गुंठे 'वर्ग-२' ची इनामी जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये २.३ कोटी रुपयांना विकल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेता तसेच कोर्टाचे वारसाहक्क प्रमाणपत्र जोडले नसतानाही सदर व्यवहार पूर्ण करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जमिनीची नोंदणी ऑनलाईन करणे बंधनकारक केले असतानाही, याप्रकरणी दुय्यम निबंधकांनी नियमांचे उल्लंघन करुन सदर जमिनीची 'ऑफलाईन' पद्धतीने नोंदणी केल्यामुळे 'महाराष्ट्र हैदराबाद इनामे व रोख अनुदान अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातबाऱ्यावर 'हस्तांतरणास बंदी' असल्याचा स्पष्ट उल्लेख असतानाही, एका निवृत्त तलाठ्याने व संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून शासकीय प्रक्रियेत फेरफार करुन शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दुय्यम निबंधक, निवृत्त तलाठी व संबंधित खरेदीदारावर कारवाई करण्याबाबत तसेच सदर बेकायदा खरेदीखत रद्द करून भविष्यात ऑफलाईन नोंदणी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मौजे भेंडाळा, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्र.२१४ मधील ३१ एकर १९ गुंठे या मिळकतीची जमीन मालक यांनी खरेदी दस्त क्र.६९१८/२०२५, दिनांक १७.११.२०२५ अन्वये विक्री केलेली आहे.

(२) हैद्राबाद व रोख अनुदाने रद्द करणे अधिनियम, १९५४ मधील तरतुदीनुसार मदद मश प्रकारातील जमीन ही कृषी संबंधी प्रयोजनासाठी हस्तांतरीत करतांना सक्षम प्राधिकारी यांची पुर्वपरवानगी किंवा नाहरकत घेण्याची आवश्यकता नाही.

सदर दस्त नोंदणी करतांना मयत व्यक्तीच्या वारसांची संमतीदार म्हणून स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. दस्त नोंदणी नंतर दिनांक २७.११.२०२५ व दिनांक २८.११.२०२५ रोजी तहसिल कार्यालय, गंगापूर येथे दोन आक्षेप अर्ज प्राप्त झाले असुन सदर आक्षेपावर वादी व प्रतिवादी यांची सुनावणी दिनांक १३.०३.२०२६ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही, खरेदीखत दस्त क्रमांक दस्त क्र.६९१८/२०२५, दिनांक १७.११.२०२५ ऑनलाईन पध्दतीने नोंदवलेला आहे.

(४) व (५) खरेदी खतानंतरचा फेरफार ई-म्युटेशन प्रणालीव्दारे नियमित पध्दतीने घेण्याऐवजी आदेश व दस्ताऐवज प्रकारातून ग्राम महसूल अधिकारी सजा मौजे भेंडाळा यांनी चुकीच्या पध्दतीने नोंद घेतलेली आहे. त्यामुळे ग्राम

महसूल अधिकारी यांना दिनांक १६.१२.२०२५ रोजी निलंबित केलेले आहे व विभागीय चौकशी प्रक्रीया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वन्य प्राण्यांच्या हल्यामध्ये नागरिकांचे मृत्यू व शेत पिकाचे होत असलेले नुकसान

**(२७) * २३०३७ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सचिन पाटील (फलटण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.केवलराम काळे (मेळघाट), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नागपूर, नाशिक, रत्नागिरी, जळगाव, बुलढाणा, ठाणे, चंद्रपूर, अहिल्यानगर, धुळे, सोलापूर, सिंधुदूर्ग, गडचिरोली, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, सांगली, कोल्हापूर, मुंबई, पुणे या जिल्ह्यात सन २०२१ ते डिसेंबर २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीत वाघ, बिबटे, रानडुक्कर, वानरे, हत्ती, नीलगाय, माकडे, हरीण, कोल्हे, अस्वल, लाडगा, बोकड, वाघ, तरस, रानगवा इत्यादी वन्य प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यात ३७७ नागरिकांचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे पशुधन व शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाला तब्बल ७२ लाख ४५ हजारांहुन अधिक नुकसान भरपाई दयावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातपुडा पर्वत रांगालगत असलेल्या गावामध्ये वन्यप्राणी थेट शेत पिकात येत असल्याने याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही वन विभागाकडून याची दखल घेतली जात नसल्याने शेत पिके

वाचवण्यासाठी शासनाने तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असून वन्यप्राण्यांच्या हल्ल्यासंदर्भात उपाययोजना करण्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यु झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला असून हल्यामुळे जीव गमावणाऱ्या तसेच गंभीर जखमी झालेल्या नागरिकांना आर्थिक मदत देताना स्थानिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनियमितता व गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वनक्षेत्रालगत असलेल्या जमिनीला मोठे तार कुंपण (फेन्सींग) करणे, वन विभागाचे विशेष हॅलिकोप्टरद्वारे जाळयाच्या माध्यमातून नागरी वस्तीतील वन्य प्राणी पकडुन घनदाट जंगलात सोडणे बिबट्यांना पकडण्यासाठी टास्क फोर्स तयार करणे व आवश्यक ठिकाणी पिंजरे लावणे इ.मागण्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे हे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,   नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) राज्यात सन २०२१-२०२२ ते सन २०२५-२०२६ (माहे डिसेंबर,२०२५ अखेर) या कालावधीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ३९४ व्यक्तींचा मृत्यु झाल्याची नोंद आहे.

(२) उपरोक्त घटनांमुळे पशुधन हानी व शेतपिकांचे नुकसान होत आहे ही वस्तुस्थिती आहे. सदर प्रकरणांमध्ये प्रचलित नियमातील तरतूदीनुसार वेळोवेळी नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

वन्यप्राणी गणनेनुसार राज्यात वाघांच्या एकूण संख्येपैकी २०० पेक्षा जास्त वाघ चंद्रपूर जिल्ह्यात आहेत.

(३) वन विभागामार्फत वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे करण्यात येणारे प्रभावीपणे संवर्धन यामुळे वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

वन्यप्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे सदर वन्यप्राणी त्यांचे नैसर्गिक अधिवासाच्या शोधात स्थलांतर करीत असतात सदर प्रक्रियेमुळे जैवविविधता समतोल साधला जातो. सदर प्रक्रिये दरम्यान मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करणे व वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व इतर स्तरावरुन क्षेत्रिय स्तरावर तसेच शासन स्तरावर विविध निवेदने प्राप्त होतात ही वस्तुस्थिती आहे.

(४) महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याकरीता अर्थसंकल्प निधी वितरण प्रणालीवर २४०६ २३६६ या लेखाशिर्षांतर्गत उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वाघ आणि बिबट ह्यांच्या प्रादुर्भावामुळे वनालगत असलेल्या गावांमध्ये अलिकडे वारंवार होत असलेल्या मनुष्यहानी आणि वाढणाऱ्या पिक नुकसानीच्या घटना लक्षात घेता, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेची व्याप्ती वाढवून वनालगतच्या काही गावातील वन सीमेवर साखळी जाळीचे कुंपन घालण्याबाबत शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-०५.१७/ प्र.क्र. ९७/फ-१, दिनांक २१.३.२०१८अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

विभागनिहाय मानव वन्यजीव संघर्ष हाताळणे कामी शिघ्र कृतीदल कार्यान्वित करण्यात आलेले असून त्यांना मानव-बिबट्या संघर्षाची परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिघ्रकृती दलाकडे अत्याधुनिक

साधन सामग्रीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(६) मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.

• राज्य शासनाने १५० बिबट्यांच्या नसबंदीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता. त्यावर दिनांक १७.११.२०२५ रोजी प्रायोगिक तत्वावर जुन्नर वन विभागातील ५ मादा बिबट्यांना जेरबंद करुन नसबंदी करण्याची परवानगी केंद्र शासनाने दिली आहे. त्यानुसार शासनाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदरचा अभ्यास सहा महिन्यात पुर्ण होण्याची अपेक्षा असून, त्यानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

• स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकिय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.

• आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

• नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

• वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत येत आहे.

• हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले कमी करण्यासाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काही ठिकाणी केला जात असून भविष्यात मोठ्या प्रमाणात वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतील नागपूर विभागातील प्रलंबित प्रस्तावांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२८) * २२९७८ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचा अपघातात मृत्यू अथवा कायम अपंगत्व आल्यास त्यांच्या कुटूंबियांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतुन दिले जाणारे अनुदान कागदोपत्रीच असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ८ महिन्यात नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या ६ जिल्हयात ८४२ शेतकरी अपघातांच्या घटना घडल्या असून त्यांच्या कुटूंबियांकडून कृषी विभागाकडे प्रस्तावही दाखल करण्यात आले असून मंजूर ४९४ प्रस्तांवापैकी केवळ १९९ प्रस्तावांना ३ कोटी ९६ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे तरी उर्वरित २९५ प्रस्ताव निधी अभावी प्रलंबित असून निधी कमी असल्याने सदरचे प्रस्ताव मंजुर होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित असलेल्या २९५ प्रस्तावांकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) हे खरे नाही. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयांकरिता एकूण मंजूर प्रस्ताव ७०३ इतके असून, डिसेंबर, २०२५ अखेरपर्यंत ४१९ इतक्या प्रस्तावांना रु.८.३५ कोटी इतके अनुदान संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत.

(३) उर्वरित २८४ प्रस्तावांना अनुदान देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बल्लारपूर ते वर्धा (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) तसेच वर्धा, यवतमाळ व नांदेड या जिल्यातील रेल्वे मार्गाच्या कामात अवैधरीत्या मुरुमाचे उत्खनन केल्याबाबत**

**(२९) * २३०२८ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर ते वर्धा (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) या तिसऱ्या रेल्वे मार्गाचे काम सुरु असून यासाठी लागणारे मुरूम उत्खननाची परवानगी पुण्यातील सोनाई इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला देण्यात आली असून याकरिता महसूल विभागाने आठ हजार ब्रास मुरूमाची परवानगी देण्यात आली असताना संबंधित कंपनीने उक्त तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये दोन लाख ब्रासच्यावर उत्खनन केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध उत्खनन प्रकरणी शासनाचा जवळपास ५०० कोटी रुपयांचा महसूल बुडाला असल्यामुळे या प्रकरणाची तक्रार शेतकऱ्यांमार्फत विभागीय आयुक्त, महसूल, नागपूर यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वर्धा, यवतमाळ व नांदेड या रेल्वे प्रकल्पाच्या कामात उत्खननादरम्यान काढण्यात आलेल्या गौण खनिजाची विनापरवाना विक्री करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात झालेल्या सुनावणीमध्ये गौण खनिज गैरव्यवहारावर जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अवैधरीत्या मुरुमाचे उत्खनन करून करोडो रुपयांच्या महसूलाची चोरी प्रकरणाचे अहवाल तहसीलदार, भद्रावती यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविले असताना याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) मौजा नंदोरी बु.,ता.भद्रावती, जि.चंद्रपूर येथील स.नं. ५८४, स.क्र.५८३/१/अ, स.क्र.२९०/२ मधून वेगवेगळया आदेशाव्दारे एकूण ७५०० ब्रास मुरुम उत्खननाची महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अन्वये तात्पुरते परवाने संबंधित कंपनीस देण्यात आलेल्या आहेत.

शेतकरी संरक्षण समिती,चंद्रपूर यांच्याकडून जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार, भद्रावती यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेतल्याच्या तांत्रिक मोजणीमध्ये मौजा नंदोरी बु., येथील ग.नं.५८४, ५८३/१/अ, ५९०/२, ५९०/३, तसेच मौजे विसलोन येथील ग.नं.१२९ या सर्व गटामधुन एकूण ९६,६३२ ब्रास उत्खनन आढळून आल्याने संबंधित कंपनीविरुध्द वेगवेगळया

दिनांकान्वये एकूण रु.१००,४२,९९,२००/- एवढया दंडात्मक रकमेचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द संबंधित कार्यालयाने उपविभागीय अधिकारी,भद्रावती यांच्याकडे अपिल दाखल करण्यात आले असून त्यावर सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

तसेच संबंधित कंपनीकडून मौजा विसापुर, ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर येथील ग.नं ४३३/१, मधुन अवैधरित्या माती या गौण खनिजाचे उत्खनन करताना आढळून आलेल्या एक पोकलेन मशीन व २ ट्रक करीता रु.१२,२५,४००/- एवढी दंडात्मक रक्कम शासन जमा करुन घेण्यात आलेली आहे. तर ११० ब्रास अवैध माती उत्खननासाठी तहसिलदार बल्लारपूर यांच्याकडून रु.६,३१,४००/- दंडात्मक रकमेचे आदेश संबंधित कंपनीविरुध्द पारित केले आहेत.

(३) वर्धा जिल्हयात रेल्वे प्रकल्पाच्या कामात उत्खननादरम्यान काढण्यात आलेल्या गौण खनिजाची विनापरवानगी विक्री करुन शासनाचा कोटयावधी रुपयांच्या महसूल बुडवुन गैरव्यवहार केला असल्याची बाबत निर्दशनास आलेली नाही.

नांदेड जिल्हयात pacakage iv अंतर्गत यवतमाळ-नांदेड या नवीन ब्रॉडगेज लाईन km२०७ to २५३ कामासाठी संबंधित कंत्राटदार यांना मौजा मनाठा येथील स.क्र.२९०, मौजा कवाना येथील स.क्र.१२, मौजा पांगरी येथील ग.नं.९७ व मौजा कार्ला येथील ग.नं.१४० मध्ये उत्खननाची परवानगी देण्यात आलेल्या उत्खनन स्थळाची ईटीएस मोजणी करण्यात आली असता, त्यांनी परवानगी पेक्षा २२२७ ब्रास उत्खनन केले असल्याचे दिसून आलेले संबंधित कंपनीस रु.१५,२३,१४२/- रुपये शासन जमा करण्याबाबत दिनांक ०६.०२.२०२६ रोजी नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

यवतमाळ जिल्हयात वर्धा-यवतमाळ नांदेड या नवनिर्मित रेल्वे विकास प्रकल्पाच्या अनुषंगाने मौजा कैलासनगर येथील ग.नं.२४, कुपटी येथील ग.नं.५० वसंतनगर येथील ग.नं.१७/१ व चुरमुरा येथील नं.१०८/१/अ, उमरखेड यामध्ये ५७५५३२.१६ ब्रास अतिरिक्त गौण खनिज उत्खनन केल्याचे अनुषंगाने संबंधित कंपनीस नोटीस बजाविण्यात आलेली आहे. तसेच यवतमाळ जिल्हयातील उर्वरित ठिकाणी ईटीएस मोजणीची कार्यवाही सुरु आहे.

(४) शेतकरी संरक्षण समिती,चंद्रपूर यांनी संबंधित कंपनीने त्यांना उत्खननास परवानगी दिलेल्याच्या ठिकाणी अवैध उत्खनन करण्यात येत असल्याबाबतची तक्रार विभागीय आयुक्त, नागपूर दिनांक २७.०७.२०२५ रोजी रोजी दाखल केली. सदर तक्रार विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडून चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे वर्ग करण्यात आली.

(५) व (६) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक ०८.०८.२०२४ रोजी जिल्हाधिकारी चंद्रपूर कार्यालयातील पथकाकडून ईटीएस मोजणी करण्यात आली असता संबंधित कंपनीने भद्रावतील तालुक्यात ८९९७०.६२ ब्रास अवैध उत्खनन केली. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी तहसिलदार भद्रावती यांच्याकडे अहवाल पाठविण्यात आले असता, तत्पूर्वीच त्याच प्रकरणी अवैध उत्खनन अनुषंगाने संबंधित कंपनीविरुध्द वेगवेगळया दिनांकान्वये एकूण रु.१००,४२,९९,२००/- एवढया दंडात्मक रकमेचे आदेश तहसिलदार, भद्रावती यांनी पारित केले आहेत. त्यामुळेवेगळ्या कार्यवाहीचीआवश्यकता उरली नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौ.सातारा (ता. जि. छत्रपती संभाजीनगर) परिसरातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखून महसूल वृद्धी करण्याबाबत**

**(३०)** * **२३८६८ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सातारा (ता. जि. छत्रपती संभाजीनगर) येथील परिसरात गट क्र.२४७ मधील डोंगर बेकायदेशीरपणे पोखरून सुमारे १५,५०० ब्रास मुरूमाचे अवैध उत्खनन करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अवैध उत्खनन सन २०११ पासून सुरू असतानाही मागील १४ वर्षांत स्थानिक महसूल व प्रशासकीय विभागाने याकडे दुर्लक्ष केले असून, कोणत्याही शासकीय परवानग्या न घेता जेसीबीच्या सहाय्याने नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट व नियमांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागाने पंचनामे करून सुमारे १५,४५० ब्रास पेक्षा अधिक मुरूम चोरी झाल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान स्पष्ट केले असतानाही उक्त विभागाकडून फौजदारी कारवाईसाठी दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह संवेदनशील डोंगराळ भागांचे सॅटेलाईट किंवा ड्रोनद्वारे नियमित सर्वेक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) मौजे सातारा, ता.जि.छात्रपती संभाजीनगर येथील ग.नं. २४७ मध्ये अंदाजे १५,४५० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचा अहवाल मंडल अधिकारी, उस्मानपूरा यांनी अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक ०५.१२.२०२५ रोजी सादर केला. अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर यांनी मंडल अधिकारी, उस्मानपूरा यांचा अहवाल व सदर गटातून जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १२.०२.२०२१ रोजी २१०० ब्रास उत्खननास देण्यात आलेली परवानगी विचारात घेवून १३,३५० ब्रास अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीपोटी दिनांक २४.०१.२०२६ रोजी रू.०८,८९,११,००० एवढ्या रकमेचे दंडात्मक आदेश संबंधित शेतमालक यांच्या विरूध्द पारित केले आहेत. सदर दंडात्मक रकमेचा बोजा ग. न.२४७ च्या गा.नं. नं.७/१२ वर दाखल करण्यात आलेला आहे. तसेच संबंधितांविरूध्द पोलीस स्टेशन, सातारा येथे दिनांक १७.१२.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस), २०२३ च्या कलम ३०३(२) आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) राज्यात गौण खनिजाच्या उत्खननाची ड्रोनव्दारे मोजणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर,व भंडारा जिल्यात
## अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(३१) * २३०४१ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील संपूर्ण रेतीघाट तसेच रेती उपशावर बंदी असतांना माहे डिसेंबर, २०२५ पासून कन्हान नदीवरील शिंगोरी या रेतीघाटातून रेतीचा अवैध उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कुही (जि.नागपूर) तालुक्यातील राजोला-कोटगाव नजिक कन्हान नदीपात्रातून माहे मे ते जून, २०२५ मध्ये अवैध रेती उपशाच्या धाड टाकून जप्त करण्यात आलेली व महसूल विभागाच्या ताब्यात असलेली ३०० ब्रास रेती महसूल विभागाच्या आवारातून गायब झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कुही (साळवा) येथे अवैधरित्या वाळूची वाहतूक करणा-या आरोपींविरुध्द कुही पोलिसांनी कारवाई करून वाहनासह ४० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील वाळू घाटांचा लिलाव झालेला नसतांनाही चंद्रपूर जिल्ह्यातील वाळू माफियांकडून वणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच चंद्रपूर जिल्हयातील तळोधी गावाच्या काही अतंरावरुन मुरमाची टिप्परद्वारे अवैधरित्या वाहतुक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, लाखांदुर (जि.भंडारा) तालुक्यातील साखरा घाटात रेती तस्कराकडून अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून मोठया प्रमाणात रेतीची तस्करी सुरु असल्यामुळे साखरा घाटात महसूल विभागाने जेसीबी, टिप्पर व ट्रॅक्टरसह रेती जप्त केली असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, महसूल विभागाने मागील सहा महिन्यांत कुही तालुक्यातील किती अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने पकडली, त्यांच्याकडून किती दंड वसूल केला व किती जणांवर गुन्हे (FIR) दाखल करण्यात आले, याचा सविस्तर तपशील काय आहे,

(८) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह अवैध वाळू उपसा व तस्करी रोखण्यासाठी मुख्य वाळू घाटांवर CCTV कॅमेरे लावणे, ड्रोनद्वारे देखरेख करणे तसेच वाळू उपशावर नियंत्रण आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नागपूर जिल्ह्यातील पारशिवणी तालुक्यातील मौजा शिंगोरी येथे नायब तहसिलदार, पारशिवणी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, पोलीस पाटील व महसूल सेवक यांच्याकडून झालेल्या तपासणीत अंदाजे ६-७ ब्रास अवैध रेतीसाठा आढळून आला. सदर वाळूसाठा जप्त करून घरकूल लाभार्थी यांना मोफत वाटप करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

मौजा राजोला येथे माहे मे ते जून, २०२५ मध्ये एकूण चार ठिकाणी धाड टाकण्यात आली असता एकूण ७२ ब्रास रेतीसाठा आढळून आल्याने त्या पंचनाम्याप्रमाणे तहसिलदार, कुही यांनी संबंधितास हा रेतीसाठा वैध मार्गाने केल्याबाबत पुरावे सादर करण्याची नोटीस संबंधितास बजाविली आहे. मात्र महसूल विभागाच्या ताब्यात असलेला ३०० ब्रास रेतीसाठा महसूल विभागाच्या आवारातून गायब झाल्याची घटना दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान घडलेली नाही.

(३) होय.

कुही पोलीस स्टेशन हद्दीतील पाचगाव (ता.उमरेड) येथे अवैधरित्या रेतीची वाहतुक करताना आढळून आलेल्या टिप्पर वर कुही पोलीस स्टेशन येथे दिनांक ०७.०१.२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता (बी. एन.एस) २०२३ चे कलम, ३०३(२), ४९, ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(८) आणि खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ च्या कलम ४ व २१ अन्वये संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येवून, रू.४०,४०,००० एवढ्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील मौजे साखरा येथील शेतशिवारातून दिनांक १२.०१.२०२६ रोजी १ जेसीबी, १ टिप्पर, १ मिनी टिप्पर व १ ट्रॅक्टर द्वारे रेतीची अवैध वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामूळे पोलीस स्टेशन दिघोरी, ता.लाखांदूर येथे गु.र.क्र. ००६/२०२६, भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) २०२३ चे कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(८) व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम ७ व ९ अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर वाहनांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(८) अन्वये उपविभागीय अधिकारी, साकोली यांनी १ जेसीबी, १ मोठा टिप्पर, १ मिनी टिप्पर व १ ट्रॅक्टर कडून रू.११,५०,००० दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तर तहसिलदार, लाखांदूर यांच्याकडून सदर वाहनातील अवैध रेतीच्या अनुषंगाने रू.१,२३,६०० एवढ्या रकमेचे दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(७) महसूल विभागाकडून नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात मागील सहा महिन्यात अवैध वाळू वाहतूक व उत्खनन प्रकरणाच्या अनुषंगाने ०४ वाहनांवर रू.९१,७०० रूपयाची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तर कुही तालुक्यात गुन्हे दाखल करण्यात आलेचे दिसून येत नाही.

(८) वाळू उपशावर नियंत्रण आणण्यासाठी महाखनिज प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्यात येते व वेळोवेळी वाळू घाटांवर तलाठी/मंडल अधिकारी/नायब तहसिलदार/ तहसिलदार/ उपविभागीय अधिकारी/ जिल्हा खनिकर्म अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेमार्फत क्षेत्रीय भेट देवून तपासणी करण्यात येते.

तसेच वाळूघाटाचा ताबा देतेवेळी वाळू घाटावर ड्रोनद्वारे चित्रिकरण करण्यात आले असून, वाळू घाटावर CCTV कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.